# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**राज्यातील महिला व मुलींच्या अत्याचारात झालेली वाढ**

**(१) ८४८८२ (०४-०९-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महिला व मुली यांच्यावरील अत्याचारात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार भविष्यात अशा घटना घडू नयेत म्हणून शासनाने कोणती उपाययोजनात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०९-२०१९) :** (१) राज्य गुन्हे २०१४, २०१५ व २०१६ च्या अहवालावरून सन २०१४ ते २०१६ या कालावधीत महिलांवरील अत्याचाराबाबत दाखल गुन्ह्यांची सांख्यिकी माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | दाखल गुन्हा | सन २०१४ | सन २०१५ | सन २०१६ |
|---|---|---|---|---|
| १ | बलात्कार | ३४३८ | ४१४४ | ४१८९ |
| २ | बलात्काराचा प्रयत्न | १५ | १३ | १२ |
| ३ | अपहरण व अपनयन | २४५७ | ५०९६ | ६१६९ |
| ४ | हुंडाबळी | २७९ | २६८ | २४८ |
| ५ | विनयभंग | १०००१ | ११७१३ | ११३९६ |
| ६ | अपमानास्पद वागणुक/छेडछाड | १५७५ | १११९ | ९२४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | पती किंवा त्यांचे नातेवाईकांकडून छळ | ७६९६ | ७६४० | ७२१५ |
| ८ | परदेशी देशातील मुलींची (२१ वर्षापर्यंतच्या) आयात | १ | ० | १ |
| ९ | आत्महत्येस प्रवृत्त करणे | ९८६ | ७०२ | ७५६ |
| १० | हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ | ३९ | ४२ | ३८ |
| ११ | बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम | ० | ० | २२ |
| १२ | कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ | ४ | ८ | २ |
| १३ | अनैतिक व्यापार (प्रतिबंधक) कायदा | २०२ | ३८१ | ३०३ |
| | एकूण गुन्हे | २६६९३ | ३११२६ | ३१२७५ |

(२) व (३) महिलांचा विनयभंग, बलात्कार, कौटुंबिक हिंसाचार इत्यादी प्रकारच्या महिलांवरील अत्याचारांच्या घटनांचा सखोल, परिपूर्ण व तातडीने तपास करून, आरोपींविरूद्द तात्काळ खटले दाखल करण्याची कार्यवाही करणे याकरीता जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र महिला पोलीस तपास पथक स्थापन करणेबाबत दिनांक १२/१०/२०१७ च्या शासन निर्णयान्वये अन्वये आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे. त्यानुसार राज्यातील सर्व जिल्ह्यात विशेष पथकाची स्थापना करण्यात आली आहे.

राज्यातील महिला व मुलीं वर होणा-या अत्याचाराला आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना खालीलप्रमाणे आहे. :-

• महिलांवरील अत्याचारास प्रतिबंध करण्यासाठी महिला अत्याचार प्रतिबंधक विभागाची स्थापना करण्यात आली आहे. विशेष पोलीस महानिरीक्षक हे विभागाचे प्रमुख आहेत.

• महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे तातडीने निकाली काढण्याकरीता राज्यात २७ विशेष न्यायालये व २५ जलदगती न्यायालये स्थापन करण्यात आलेली आहेत.

• पोलीस आयुक्तालये / जिल्ह्यांमध्ये महिला सुरक्षा समित्या व महिला सहाय्य कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

• बलात्कारासारख्या गंभीर गुन्हयांचा तपासाची कार्यपध्दती बाबतच्या मार्गदर्शक सुचना सर्व पोलीस घटकांना वितरीत केलेल्या आहेत.

• हुंडाबळीकरीता प्रतिबंधात्मक उपाय प्रत्येक जिल्ह्यात दक्षता समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

• छेडछाड व विनयभंगाच्या घटना रोखण्यासाठी पायी पेट्रोलिंग,शाळा कॉलेजच्या परिसरात प्रतिबंधात्मक उपाययोजना,नाकाबंदी, महिला सुरक्षा व छेडछाड पथके तयार करण्यात आली आहेत.

• मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली विशाखा निर्णयाप्रमाणे पोलीस घटकांमध्ये तक्रार समित्या (Complaint Committees) स्थापन करण्यात आल्या आहेत. कामाच्या ठिकाणी लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा-२०१३ देखील अंमलात आला आहे.

• राज्यात,मुंबईसह पुणे शहर, ठाणे शहर, नागपूर शहर, पुणे ग्रामिण, यवतमाळ, अहमदनगर येथे Investigation Units for Crime Against Women (IUCAW) स्थापन केली आहेत.

• दिनांक ३१.०३.२००८ रोजी राज्य गुन्हे अन्वेषण विभागात अनैतिक वाहतूक प्रतिबंध कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्यात १२ घटकांमध्ये केंन्द्र शासन व राज्य शासनाच्या अधिपत्याखाली स्वतंत्र अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

• समस्याग्रस्त महिलांचे समुपदेशन करण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये महिला पोलीस कक्ष स्थापन करण्यात आली आहेत. मा.धर्माधिकारी समितीने सुचविलेल्या शिफारशीनुसार रेल्वेस्टेशन परिसर व एस.टी. स्टँन्ड येथे एकुण ३६४ ठिकाणी महिला मदत केंन्द्रे सुरु करण्यात आली आहेत.

• मुंबई, ठाणे व नवी मुंबई क्षेत्रातील संकटातील महिलांच्या मदतीकरिता टोल फ्रि हेल्पलाईन क्र. “१०३” व उर्वरित क्षेत्राकरिता “१०९१” सुरु करण्यात आली आहे. रेल्वे पोलीस घटक, मुंबई व पुणे ९८३३३३११११, नागपुर ०७१२-२७४३९८४ व बृहन्मुबई पोलीस घटकात २४ तास कार्यरत असणारी हेल्पलाईन सेवा कार्यरत आहे. याशिवाय www.mumbaipolice.org व comcell. mum. crime@ mahapolice.gov.in या वेबसाईटवर online तक्रार करता येते.

• महिलांवरील बलात्कार, विनयभंग, छेडछाड, अॅसिड हल्ला या अत्याचाराच्या गुन्ह्यामधील आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा होण्याच्या दृष्टीने प्रचलित कायद्यात सुधारणा करुन शासनाने फौजदारी कायदा (सुधारणा) अधिनियम, २०१३ (२०१३ चा अधिनियम क्र.१३ पारित केला आहे.)

• Criminal Law Amendment No.२ of २०१८ नुसार बलात्कारांच्या गुन्ह्यांच्या शिक्षेत केलेली वाढ व तपासाबाबतच्या नवीन सुधारणांबाबतच्या सूचना दि.०९/०७/२०१८ रोजीच्या परीपत्रकाद्वारे देण्यात आलेल्या आहेत.

• माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील महिलांच्या सुरक्षेच्या उपाययोजना सुचविण्यासाठी दि.२७/०७/२०१७ च्या शासन निर्णयानुसार समिती गठीत करण्यात आली आहे.

• राज्यात दि. ०१ जुलै, २०१५ ते दि. ३१ जुलै, २०१७ या कालावधीत राबविण्यात आलेल्या ५ ऑपरेशन मुस्कान/स्माईल मोहिमेतंर्गत एकुण २०११२ हरवलेल्या बालकांचा शोध लावण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील 'मेळा' बस स्थानकाच्या कामात झालेली अनियमितता**

**(२) १३४९९६ (०८-०७-२०१९). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील 'मेळा' बस स्थानकाच्या कामकाजाच्या अंदाजपत्रकामध्ये ठेकेदाराला लाभ मिळवून देण्याकरीता त्यात वाढ केल्यामुळे सदर कामामध्ये अनियमितता झाली असल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतीनिधी यांनी दिनांक १५ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, एस.टी. महामंडळ यांच्याकडे केलेली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२४-०९-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) नाशिक येथील मेळा बसस्थानकाच्या पुनर्बांधणी कामासाठी सविस्तर नकाशे, आराखडे व अंदाजपत्रक तयार करण्यासाठी महामंडळाच्या पॅनेलवरील वास्तुविशारदाची नियुक्ती करण्यात आली व सदर वास्तुविशारदाद्वारे तयार करण्यात आलेल्या रु.१४ कोटी इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास महामंडळाच्या स्तरावर प्रशासकीय मंजूरी देण्यात आली. तद्नंतर राज्य परिवहन महामंडळाद्वारे ई-निविदा राबवून न्युनतम ठेकेदारास दि.०६.०७.२०१७ नुसार कामाचा कार्यादेश देण्यात आला. सदर बसस्थानकाच्या जोत्याची उंची वाढल्यामुळे फुटींग, कॉलम, स्टील व बीमच्या मापांमध्ये वाढ झाली त्यामुळे त्या अनुषंगिक कामात व साहित्यात वाढ झाल्याने, परिणामी खर्चात वाढ झाली. यामुळे सदर कामात कोणत्याही प्रकारची अनियमितता झाली नाही. सदरची बाब महामंडळाच्या दि.२९.०५.२०१९ च्या पत्रान्वये स्थानिक लोकप्रतिनिधी यांना कळविण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कालिदास कलामंदिर (नाशिक) च्या नुतनीकरणाच्या कामाबाबत

**(३) १३५००१ (११-०७-२०१९). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासन, केंद्र शासन व नाशिक महानगरपालिका यांच्या संयुक्त निधीतून राबविण्यात येणाऱ्या स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत कालिदास कलामंदिराचे नुतनीकरणाच्यावेळी नियोजनाच्या अभावामुळे महानगरपालिकेला अतिरिक्त ६६ लाख रुपयांचा खर्च करण्याची वेळ आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, योग्य नियोजन न होण्याची कारणे काय आहेत व त्यासाठी जबाबदार असणारे अधिकारी किंवा कर्मचारी कोण व त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०९-२०१९) :** (१) • कालिदास कलामंदिराचे नुतनीकरण करून तेथील यंत्रणा अद्ययावत करण्याचे काम स्मार्ट सिटी योजनेंतर्गत नाशिक विशेष उद्देश वहनाकडून करण्यात आले आहे. त्यानुसार मुळ मंजुर किंमतीच्या मर्यादेतच सदर प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असल्याबाबत अहवाल नाशिक विशेष उद्देश वहनाने सादर केला आहे.

• सदर अद्ययावत यंत्रणा चालविणे, देखभाल तसेच दैनंदिन संचलनाचे काम हे महानगरपालिका नाशिक यांचे मार्फत करण्यात येणार आहे.

(२) व (३) • कालिदास कलामंदिराच्या नुतनीकरणासंबंधी कामे निविदेतील नियोजीत अटी व शर्तीनुसार विहित कालावधीत पूर्ण करण्यात आल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक विशेष उद्देश वहन यांचेकडून कळविण्यात आले आहे.

---

**बुलढाणा येथील राज्य परिवहन महामंडळाच्या कान्होबा उद्यानाचा विकास व छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याबाबत**

**(४) १३५३६९ (०८-०७-२०१९). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा येथील संगम चौक लगतच्या राज्य परिवहन महामंडळाच्या कान्होबा उद्यानाचा विकास करण्यासह सदर ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्या करिता परवानगी मिळणेबाबत शिवछत्रपती बहुउद्देशीय स्मारक समिती, बुलढाणा यांनी मा.परिवहन मंत्री यांना दिनांक १५ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिलेले निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने राज्य परिवहन महामंडळाच्या नाहरकती सह मंजुरी प्रदान करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२४-०९-२०१९) :** (१) होय. सदरचे पत्र दि.०३.०३.२०१८ रोजी प्राप्त झाले आहे.

(२) वाढते शहरीकरण/नागरीकरणामुळे राज्य परिवहन वाहतूकीत मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याने व भविष्यातील वाढ विचारात घेता सध्या कार्यरत असलेल्या बसस्थानके/आगारांच्या जागा प्रवासी/बसेस यांकरिता अपुऱ्या पडत असल्यामुळे राज्य परिवहन महामंडळाची बसस्थानके आगारे व अनुषांगीक सर्व आस्थापनांच्या ठिकाणी कोणत्याही महापुरषांचे, लोक नेत्यांचे पुतळे, स्मारके उभारण्यासाठी अथवा त्याकरिता जागा उपलब्ध करुन देण्याचे राज्य परिवहन महामंडळाचे धोरण नसल्याने अशी मागणी आल्यास ती फेटाळण्यात यावी. असे राज्य परिवहन महामंडळाद्वारे संबंधितांस दि.०७.०३.२०१८ व दि.०८.०२.२०१९ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे शहरातील अनेक खासगी रुग्णालये आणि नर्सिंग होम्सनी अग्निशमन विभागाचे ‘ना हरकत प्रमाणपत्र’ घेतले नसल्याबाबत

**(५) १३५३७४ (११-०७-२०१९). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील ७० रुग्णालयांनी अग्नीशमन विभागाची परवानगी न घेता रुग्णालये सुरु केल्याची बाब मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या खासगी रुग्णालये आणि नर्सिंग होम्सनी कायद्यानुसार अग्निसुरक्षेविषयी अग्निशमन विभागाकडून ‘ना हरकत प्रमाणपत्र’ घेतलेले नाही त्यांना तात्काळ बंद करावे असे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाने ठाणे महानगरपालिकेला दिल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे शहरातील सदर खासगी रुग्णालये आणि नर्सिंग होम्यनी ‘ना हरकत प्रमाणपत्र’ न काढण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर प्रकरणांची चौकशी करुन अग्निसुरक्षेविषयी 'ना हरकत प्रमाणपत्र' शिवाय ही रुग्णालये सुरु करण्यास मंजूरी देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१९) :** (१) होय.

(२) मा.उच्च न्यायालयाची जनहित याचिका क्र.११/२०१८ व दिनांक १८.०४.२०१९ नुसार आदेश प्राप्त झाल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या एकूण ३४८ रुग्णालयांपैकी ५९ रुग्णालये डे केअर सेंटर असल्याने या आस्थापनांना अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.

२०५ रुग्णालयांना ना-हरकत प्रमाणपत्र दिले असल्याचे आढळून आले आहे.

उर्वरीत ८३ रुग्णालयांपैकी ११ रुग्णालये बंद असून १५ रुग्णालये सिल करण्यात आली आहेत, तर ५७ रुग्णालयांविरुध्द महानगरपालिका स्तरावर कार्यवाही सुरु असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नोटाबंदीनंतर बेरोजगारीचा दर वाढल्याबाबत**

**(६) १३५६२९ (१५-०७-२०१९). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नोटाबंदीनंतर म्हणजेच माहे नोव्हेंबर, २०१६ पासून जवळपास ५० लाख जणांनी रोजगार गमावला असल्याचे अझीम प्रेमजी विद्यापीठाच्या अहवालात म्हटले आहे, परंतु प्रत्यक्षात त्याहीपेक्षा जास्त जणांचा रोजगार गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशातील बेरोजगारीचा दर माहे एप्रिलच्या पहिल्या तीन आठवड्यांत ८.१ टक्के इतका नोंदवला गेल्याचे सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी या संस्थेने म्हटले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामध्ये २० ते २४ वयोगटातील तरुण मोठ्या प्रमाणात बेरोजगार आहेत तसेच स्त्रियांची संख्याही अधिक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी औद्योगिक धोरणांमध्ये बदल करण्याबाबत तसेच नोटाबंदीनंतर झालेली परिस्थिती पूर्ववत करण्यासाठी व तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०४-१०-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी या खाजगी संस्थेमार्फत दि. ०२.०५.२०१९ च्या श्रम सांख्यिकीच्या साप्ताहिक अंदाजामध्ये बेरोजगारीचा दर याबाबत काही आकडेवारी प्रसिध्द झाली आहे. त्यामुळे बेरोजगारीच्या या प्रकाशनातील आकडेवारीसंदर्भात भाष्य करणे उचित होणार नाही.

(४) रोजगाराच्या संधी वाढण्यासाठी उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दि.०७.०३.२०१९ अन्वये महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण-२०१९ हे निश्चित केले आहे. यामध्ये नवीन फ्लॅगशिप योजनेचा शुभारंभ- मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना सुरु केलेली असून या योजनेमध्ये बँकेकडून सहज व सोप्या पध्दतीने अर्थसहाय्य देऊन स्थानिक युवकांना स्वयंरोजगाराकडे प्रेरित करणे तसेच शासन निर्णय दि. २४.०४.२०१८ अन्वये रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात येते.

आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता संचालनालय, नवी मुंबई यांचे मार्फत (१) रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांचे संगणकीकरण,(२) बेरोजगार उमेदवारांसाठी ग्रंथालय सदृश अभ्यासिका निर्माण करणे, (३) रोजगार मेळावे आयोजित करणे, (४) बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था स्थापन करणे, (५) आदिवासी उमेदवारांसाठी रोजगार व स्वयंरोजगार प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र , (६) रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम (ईपीपी), (७) महाराष्ट्र राज्यात व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र स्थापन करणे, (८) प्रमोद

महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान या योजना राबविण्यात येतात तर स्वयंरोजगारासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत (अ) वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, (ब) गट कर्ज व्याज परतावा योजना, (क) गट प्रकल्प योजना या योजना राबविण्यात येतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई मराठी ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढ, बढती व इतर प्रलंबित मागण्यांबाबत

**(७) १३५६४२ (१५-०७-२०१९). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.सुभाष साबणे (देगलूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई मराठी ग्रंथालयाच्या कर्मचाऱ्यांनी वेतनवाढ, बढतीसह विविध प्रलंबित मागण्यांसाठी बेमुदत उपोषण आणि धरणे आंदोलन करणार असल्याबाबतचे निवेदन शासनास दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रंथालयाच्या मध्यवर्ती कार्यकारणीच्या मनमानी कारभाराविरोधातही कर्मचाऱ्यांनी लेखी निवेदनाद्वारे मा.शालेय शिक्षण आणि सांस्कृतीक मंत्री, राज्याचे ग्रंथालय संचालक यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच १२० वर्षांची परंपरा असलेल्या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या बेकायदेशीर निवडणुका आणि आर्थिक घोटाळा यांची चौकशी करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्र्यांनी दिले असल्याचे माहे मार्च २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, धर्मादाय आयुक्त कार्यालयातही मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाबाबतच्या विविध तक्रारी प्रलंबित असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच मुंबई मराठी ग्रंथालयाच्या कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१०-२०१९) :** (१) व (२) मुंबई मराठी ग्रंथालयाच्या कर्मचाऱ्यांनी वेतनवाढ, बढतीसह विविध प्रलंबित मागण्यांसाठी बेमुदत उपोषण आणि धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याबाबत मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) व ग्रंथालय संचालक यांच्याकडे दि.११.१२.२०१८ रोजीचे निवेदन सादर केले आहे. सदर पत्रासोबतच्या मागण्यांमध्ये ग्रंथालयाच्या मध्यवर्ती कार्यकारणीच्या मनमानी कारभाराविरोधात कोणत्याही तक्रारीचा उल्लेख नाही.
(३) होय, हे खरे आहे.

(४), (५) व (६) होय, हे खरे आहे. धर्मादाय आयुक्त, बृहन्मुबई कार्यालयात खालील चौकशी प्रकरणांबाबत कार्यवाही सुरु आहे. (१) चौकशी क्र. ११/२०१७-तक्रारदार श्री.सुधीर हेगिष्टे (२) चौकशी क्र.२४/२०१८-तक्रारदार श्री.सुधीर हेगिष्टे (३) चौकशी क्र.२१/२०१९-तक्रारदार श्री.अनिल गलगली.

मुंबई मराठी ग्रंथालय ही स्वयंसेवी संस्था असल्याने कर्मचाऱ्यांची वेतनवाढ, बढती इत्यादी मागण्या शासनाच्या कार्यकक्षेतील नाहीत.

---

**कोल्हापूर येथे नवविवाहितेवर केलेला अत्याचार**

**(८) १३५८९५ (१२-०७-२०१९). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथे पतीच्या व्यवसायासाठी घेतलेल्या २० हजार रुपयांच्या व्याजापोटी अभियांत्रिकीची पदवी घेतलेल्या नवविवाहितेवर माहे जानेवारी, २०१९ पासून तीन सावकारांनी अत्याचार केल्याप्रकरणी जुना राजवाडा पोलीसांत दिनांक १९ मार्च, २०१९ रोजी वा त्यासूमारास गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार आरोपींना अटक करून त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०९-२०१९) :** (१) व (२) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून शाहुपूरी पोलीस ठाणेस गु.र.नं. २५१/२०१९ भा.द.वि.सं. कलम ३६६, ३७६, ४५२, ३७६ (ड), ५११, ३२३, ५०४, ५०६ व महाराष्ट्र सावकारी अधिनियम कलम ३९ व ४५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यामध्ये ०३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सध्या आरोपी न्यायालयीन कस्टडी मध्ये आहेत. सदर प्रकरणी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले असून सद्यस्थितीत सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुंब्रा-दिवा, कळवा-खारीगाव आणि विटावा परिसरातील पाणीटंचाईवर उपाययोजना करणेबाबत**

**(९) १३५९४० (११-०७-२०१९). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मुंब्रा-दिवा प्रभाग समितीअंतर्गत नेहमीच होणाऱ्या पाणीटंचाईच्या निषेधार्थ दिनांक ०३ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास मानवी साखळी करुन तसेच कळवा-खारीगाव आणि विटावा परिसरात होणा-या पाणीटंचाई विरोधात दिनांक ०४ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्या सुमारास कळवा प्रभाग समितीवर मोर्चा काढून आंदोलन केले होते तसेच वारंवार आंदोलने केली जात आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार नागरीकांच्या समस्या सोडविण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१९) :** (१) व (२) ठाणे महानगरपालिका क्षेत्राअतंर्गत पाणी टंचाईच्या निषेधार्थ मुंब्रा प्रभाग समितीअंतर्गत मानवी साखळी तसेच कळवा प्रभाग समितीमध्ये दिनांक ०४.०२.२०१९ रोजी मोर्चा काढून आंदोलन केले असल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

तथापि, ठाणे महानगरपालिकेने पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी तसेच पाण्याची समस्या सोडविण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना केल्या आहेत:-

• कळवा प्रभाग समिती अंतर्गत रिमॉडलिंग प्रकल्पाअंतर्गत ५ जलकुंभ बांधणे व या जलकुंभासाठी वहन वाहिन्या अंथरणेचे काम सुरु आहे.
• मुंब्रा व दिवा प्रभाग समिती क्षेत्रातील पाणी वितरण व्यवस्थेचे रिमॉडलिंग करणेसाठी सन २०१८-२०१९ मध्ये ठाणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये या प्रकल्पासाठी ५०.०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.
• मुंब्रा प्रभाग समितीमधील पाणी पुरवठ्यात सुधारणा करणेसाठी मुंब्रा विभागात ७ ठिकाणी संप-पंप हाऊसची उभारणी करणे व पंम्पींग मशिनरी बसविणेसाठी निविदा प्रक्रिया ठाणे महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत आहे.
• मुंब्रा व दिवा प्रभाग समितीमधील सविस्तर प्रकल्प अहवालाबाबत ठाणे महानगरपालिका स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## निळेगाव, नालासोपारा (प) येथील आनंद व्हयू इमारतीच्या शौचालयाची टाकी स्वच्छ करताना तीन सफाई कामगारांचा झालेला मृत्यू

**(१०) १३६४०९ (११-०७-२०१९). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निळेगांव, नालासोपारा (प) येथील आनंद व्हयू इमारतीच्या शौचालयाची टाकी स्चच्छ करताना तीन सफाई कामगारांचा गुदमरून मृत्यू झाल्याची घटना दिनांक ३ मे, २०१९ रोजी वा त्या सुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि त्यानूसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) निळेगांव, नालासोपारा (प) येथील आनंद व्ह्यू इमारतीच्या शौचालयाची टाकी स्वच्छ करताना तीन सफाई कामगारांचा गुदमरून मृत्यू झाल्याप्रकरणी वसई-विरार शहर महानगरपालिकेने खालीलप्रमाणे वस्तुस्थिती कळविली आहे:-
• वसई-विरार शहर महानगरपालिकेस उपरोक्त नमुद शौचालयाच्या सेप्टींक टँक च्या सफाईकरीता कुठल्याही प्रकारचा अर्ज अथवा कोणतीही पुर्वसुचना दिली नाही.
• शौचालयाची टाकी साफ करणेसाठी इमारतीच्या व्यवस्थापनाने टाकी साफ करण्याकरीता खाजगी व्यक्तींना टाकीत उतरविले होते.
• दिनांक ०२.०५.२०१९ रोजी शौचालयाच्या टाकीची सफाई करण्यासाठी गेलेल्या तीन व्यक्ती विषारी वायुमुळे मृत पावल्या.
• सदर प्रकरणी संबंधिताविरुध्द नालासोपारा पोलीस ठाणे गु.र.नं.१४९/२०१९, भा.दं.वि.सं.क. ३०४(अ), ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी निजामपूर महानगरपालिका हद्दीतील अत्याधुनिक कत्तलखान्याच्या इमारतीबाबत

**(११) १३६५०८ (११-०७-२०१९). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी निजामपूर महानगरपालिका हद्दीतील इदगाह रोड प्रभाग क्र. ७ मधील अत्याधुनिक कत्तलखान्याच्या इमारतीकरिता कोणत्याही सल्लागाराची नेमणूक न करता २० कोटी रुपयांच्या निधीसाठीचा प्रस्ताव महासभेमध्ये आणण्यात आल्याने सदर प्रस्तावास स्थानिक नगरसेवक व लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटना यांनी विरोध केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इदगाह रोड प्रभाग क्र. ७ मधील अत्याधुनिक कत्तलखान्याच्या इमारतीमध्ये गत अनेक वर्षे अतिक्रमण झाले असताना वेळोवेळी निवेदने देऊन सदर ठिकाणचे अतिक्रमण हटविण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अत्याधुनिक कत्तलखान्याकरीता प्रथम सल्लागार नेमणूक करणे आवश्यक असताना तसेच लागणाऱ्या साहित्यांची विविध कंपन्यामार्फत अंदाजपत्रके मागविणे आवश्यक असताना कोणत्याही प्रकारची नोटीस न काढता महासभेपुढे २० कोटी रुपयांचा खर्च दाखविण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नियमबाह्य काम करणाऱ्या शहर अभियंता यांच्यावर कारवाईची सामाजिक संस्थांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१९) :** (१), (२) व (३) • भिवंडी निजामपूर महानगरपालिका हद्दीतील इदगाह रोड प्रभाग क्र.७ येथे अत्याधुनिक कत्तलखाना बांधण्याच्या कामाकरीता तांत्रीक सल्लागार यांनी सादर केलेल्या सुसाध्यता अहवालानुसार रु.२० कोटी खर्चास प्रशासकिय मान्यता मिळणेकरीता प्रस्ताव महासभेपुढे सादर करण्यात आला.

• उक्त प्रस्तावास काही नगरसेवक, लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटना यांनी विरोध केला आहे.

• सदर ठिकाणी अतिक्रमण कत्तलखान्याच्या इमारतीमध्ये नसून इमारतीच्या परिसरात झाले आहेत.

• सदर अतिक्रमणे मनपातर्फे वेळोवेळी हटविण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याचे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

तसेच महासभेच्या मान्यतेनंतर सदरकामी विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करुन शासनाकडे निधी मान्यतेचा प्रस्ताव पाठविणे व तद्नंतर अंदाजपत्रक तयार करुन निविदा मागविणे प्रस्तावित असल्याचे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) उक्त बाब निदर्शनास आली नसल्याचे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील एकच नागरी विकासकाम अनेक वेळा दाखवून केलेला अपहार

**(१२) १३६७२० (१३-०७-२०१९). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील नागरी विकासकामे करताना एकच काम अनेक वेळा दाखवून प्रशासनातील अधिकारी अपहार करीत असल्याचे निदर्शनास आले तसेच महानगरपालिका प्रशासनातील अधिकारी निविदा प्रक्रियेमध्ये संबंधित वार्ड न टाकता बोगस कामे करीत असल्याची तक्रार शासनाच्या ई गव्हर्नस पोर्टलद्वारे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील वार्ड रचना अनेक वेळा बदलत असताना निविदा प्रक्रियेत कधी जुना तर कधी नवीन वार्ड क्रमांक टाकून प्रशासनातील अधिकारी शासनाची फसवणूक करीत असून झालेल्या निविदा प्रक्रियांची चौकशी करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व त्याची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१९) :** (१) व (२) होय, अशी तक्रार राज्य शासनाच्या ई-गव्हर्नन्स पोर्टलवर प्राप्त झाली होती.

तथापि, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नादुरुस्त रस्त्यांची दुरुस्ती करण्यासाठी दोन वेगळ्या प्रभाग समितीमध्ये वेगवेगळ्या निविदा काढल्या होत्या.

सदर दोन्ही निविदांमधील रस्ते वेगवेगळे आहेत. तसेच कामाचे स्वरुप देखील वेगळे असल्याचे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

तसेच ई-गव्हर्नन्स पोर्टलवर प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने अर्जदारास भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने पत्राद्वारे उपरोक्त वस्तुस्थिती कळविली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### विरार (जि.पालघर) येथे अल्पवयीन मुलीवर झालेला अत्याचार

**(१३) १३६८२३ (१३-०७-२०१९). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार (जि.पालघर) येथे इयत्ता ९ वीत शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीवर सामुहीक लैंगिक अत्याचार झाल्याची घटना दिनांक १८ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार आरोपींना अटक करून त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०९-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

सदर घटना दि. १५/०४/२०१९ रोजी घडलेली आहे.

(२) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून विरार पोलीस ठाणेस गु.र.नं. ३५८/२०१९ भा.दं.वि.सं. कलम ३७६ (ड), ३२३, ५०६ सह बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४ व ६ प्रमाणे दिनांक १७/०४/२०१९ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील ०२ आरोपींना अटक करण्यात आली असून सध्या दोन्ही आरोपी हे न्यायालयीन कोठडीत आहेत. सदर गुन्ह्यातील आरोपीतांविरूध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्याची तजविज ठेवली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी शहरातील (जि.ठाणे) हसीन सिनेमागृहामध्ये अनधिकृतपणे वाढीव बांधकाम केल्याबाबत**

**(१४) १३६९२९ (१३-०७-२०१९). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहरातील (जि.ठाणे) हसीन सिनेमागृहाचे अंतर्गत वाढीव बांधकाम व नुतनीकरण करताना सिनेमागृह मालकाने महानगरपालिका प्रशासनाची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेतल्याचे नुकतेच सहायक आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी केलेल्या पाहणीत निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिनेमागृह मालक गत ९ वर्षे १५ लाख रुपयांहून अधिक महानगरपालिकेचा कर न भरता अवैद्यरित्या सिनेमागृह चालवीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सिनेमागृहातील अनधिकृत बांधकामावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

भिवंडी शहरातील हसीन टॉकीजचे वाढीव बांधकाम झाल्याचे चालु वर्षामध्ये आढळून आले नसल्याचे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

तथापि, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने मालमत्ता क्र.२३२/०, मालमत्ता क्र.२३२/१ यांना दुरुस्ती करण्यास परवानगी दिली आहे.

तसेच सन २०१८-१९ पर्यंत सदर मालमत्तेचे देयक बिल रु.२०,५७,२५१ इतके आहे. त्यापैकी करापोटी रक्कम रु.१२,७१,३३९ चा धनादेश भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोवाड (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) पोलीस ठाण्यात पुरेसा कर्मचारीवर्ग नसल्याबाबत**

**(१५) १३७१०१ (१३-०७-२०१९). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कोवाड पोलीस ठाण्याच्या हद्दीत ५२ गावे येत असून कोवाड पोलीस स्टेशनमध्ये १ फौजदार, १ हवालदार, २ पोलीस नाईक व १ शिपाई एवढी पदे आहेत, हे खरे आहेत काय,

(२) असल्यास, ५२ गावांचा समावेश असलेल्या कोवाड पोलीस स्टेशनमध्ये अपूरा पोलीस कर्मचारीवर्ग असल्यामुळे येथे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून पुरेसा पोलीस कर्मचारीवर्ग देण्याची मागणी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.गृह राज्यमंत्री यांच्याकडे दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोवाड पोलीस स्टेशनसाठी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१९) :** (१), (२) व (३) होय,हे खरे आहे.

चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील चंदगड पोलीस ठाणे अंतर्गत कोवाड दुरक्षेत्र (आऊट पोस्ट) कार्यरत आहे. चंदगड पोलीस ठाणेस ०१-पोलीस निरीक्षक, ०१-पोलीस उप निरीक्षक व ४१ पोलीस कर्मचारी असे एकूण ४४ इतके मंजुर संख्याबळ आहे. सध्या चंदगड पोलीस ठाणेस ०१-पोलीस निरीक्षक, ०३ पोलीस उप निरीक्षक व ४७ पोलीस कर्मचारी असे एकूण ५१ अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत.

चंदगड पोलीस ठाण्याच्या कार्यरत मनुष्यबळातुन कोवाड दुरक्षेत्रास ०१-पोलीस उप निरीक्षक, ०१-पोलीस हवालदार, ०२- पोलीस नाईक व ०१-पोलीस शिपाई उपलब्ध करून देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव शहरातील एका वाळूमाफियाचा वाढदिवस पोलीस मुख्यालयाच्या दालनात साजरा करण्यात आल्याबाबत

**(१६) १३७३०० (१३-०७-२०१९). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव शहरातील एका वाळूमाफियाचा वाढदिवस पोलीस मुख्यालय व त्यानंतर वाहतूक शाखेच्या निरीक्षकांच्या दालनात साजरा करण्यात आल्याचा प्रकार माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वाढदिवसाचे फोटो सोशल मिडियावर व्हायरल झाले असून यामुळे पोलीस व वाळू माफिया यांच्यातील संबंध उघड झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पोलीस अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) शहर वाहतूक शाखेचे पोनि. देविदास मधुकर कुनगर यांनी खाजगी इसम नामे दिपक जानकीराम वारुळे याचे उपस्थितीबाबत पुर्णपणे शहानिशा न करता त्याचाही वाढदिवस साजरा करुन त्यालाही केक व पुष्पगुच्छ व शुभेच्छा देवून मोवाईलवर फोटो काढले असल्याचे दिसून आले हे खरे असले तरी पोलीस व वाळू माफिया यांच्यात कोणतेही संबंध नाहीत.
(३) सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली असून पोनि कुनगर यांनी आपली जबाबदारी योग्यरित्या पार पाडली नसल्याचे दिसून आल्याने त्यांना एक वार्षिक वेतनवाढ स्थगित करण्याबाबत मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र यांना शिफारस करण्यात

आलेली आहे. तसेच चापोना रविंद्र विठ्ठल जाधव व पोना २३२३ विनोद चौधरी दोन्ही नेम.शहर वाहतुक शाखा, जळगांव यांची प्राथमिक चौकशी करुन दिनांक १२/०४/२०१९ अन्वये निलंबित करण्यात आले होते. तद्नंतर संबंधित पोलीस नाईक तसेच चालक पोलीस नाईक यांना अनुक्रमे ३ वर्षे आणि १ वर्षे कालावधीसाठी वेतनवाढ स्थगित करणे (अपरिणामकारक) ही शिक्षा देण्यात आली आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**उस्मानाबाद व अहमदनगर जिल्ह्यामधील आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडून सादर केलेले अर्ज बँकाकडून मंजूर होत नसल्याबाबत**

**(१७) १३७६१२ (१५-०७-२०१९). श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडून एकूण १५०६ युवकांनी प्रस्ताव दाखल केले परंतु त्यातील फक्त ११५ प्रस्तावच बँकांनी मंजूर केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री व कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री यांचेकडे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, अहमदनगर जिल्ह्यात सन २०१८-१९ या वर्षात अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील उद्योजक होऊ इच्छिणा-या तरुणांनी विविध बँकामार्फत कर्जासाठी जिल्ह्यातील २ हजार ९०० तरुणांनी अर्ज केले होते, त्यापैकी केवळ १०३ व्यक्तींना जिल्ह्यात कर्ज वाटप करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रत्यक्षात मागणी प्रचंड असताना अहमदनगर जिल्ह्यामध्ये केवळ १०३ जणांना कर्ज देऊन मागास मराठा समाजाच्या तरुणांना कर्ज पुरवठा न केल्यामुळे मराठा समाजाच्या तरुणामध्ये संतप्त भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदरहु जिल्ह्यांमध्ये कर्ज पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०४-१०-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे

महामंडळाच्या वेब प्रणालीवरील माहितीनुसार, एप्रिल, २०१९ पर्यंत उस्मानाबाद जिल्ह्यात १६२० उमेदवारांनी पात्रता प्रमाणपत्र निर्माण केलेले आहेत व त्यापैकी १७० उमेदवारांना बँकेकडून कर्ज वाटप करण्यात आले आहे.

(२) होय.

(३) हे अंशत: खरे आहे.

महामंडळाच्या वेब प्रणालीवरील माहितीनुसार, अहमदनगर जिल्ह्यात एप्रिल, २०१९ पर्यंत १८९२ उमेदवारांनी पात्रता प्रमाणपत्र निर्माण केलेले आहेत व त्यापैकी १६८ उमेदवारांना बँकेकडून कर्ज वाटप करण्यात आले आहे.

(४) मराठा समाजाच्या तरुणांना कर्ज पुरवठा न केल्यामुळे मराठा समाजाच्या तरुणांमध्ये संतापाची भावना निर्माण झाल्याविषयीची कोणतीही तक्रार राज्य स्तरीय बँकर समितीकडे प्राप्त झालेली नाही.

(५) महामंडळामार्फत वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना व गट कर्ज व्याज परतावा योजनांतर्गत कर्ज वाटप करीत नसून राज्यातील तरुण तरुणींना व्यवसायाकरिता बँकेमार्फत घेतलेल्या कर्जावरील व्याज परतावा करीत आहे. कर्ज मंजूर वा नामंजूर करण्याची संपूर्ण प्रक्रीया संबंधीत बँकांच्या स्तरावर होत असून, कर्ज मंजूरीच्या प्रक्रीयेमध्ये महामंडळ हस्तक्षेप करीत नाही. मात्र कमी बँक मंजूरीच्या संख्येमुळे बँकेबल प्रकरणांना तात्काळ निकाली काढण्यात येवून संबंधीत जिल्ह्यातील तरुण-तरुणींना रु.१०.०० लाखाच्या मर्यादेत विनातारण कर्ज मंजूर होण्याच्या दृष्टीने सहाय्य करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदय व इतर मा.मंत्री यांनी स्टेट लेवल बँकर्स कमिटीला निर्देश दिले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती जिल्हा आरोग्य परिषद कार्यालयातील विभागाच्या लेखापालाला लाच घेताना अटक केल्याबाबत

**(१८) १३७८२५ (१३-०७-२०१९). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावतीतील स्थानीक जिल्हा सामान्य रुग्णालय परिसरात असलेल्या जिल्हा परिषद कार्यालयातील लेखापाल श्री.अमोल भगवंतराव ढोले यांना दिनांक २५ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास ७ हजाराची लाच घेतांना अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लेखापालावर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर लेखापालावर निलंबनाची कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१९) :**(१) व (२) होय,

आरोपी लोकसेवक श्री. अमोल भगवंतराव ढोले, लेखापाल (कंत्राटी) यांनी पुरविलेल्या १४०० पाणी कॅनचे प्रती कॅन ५/- रुपये प्रमाणे ७०००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने दिनांक २५.०४.२०१९ रोजी आयोजित सापळा कार्यवाही दरम्यान ७०००/- रुपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली म्हणुन पो.स्टे. सिटी कोतवाली, अमरावती शहर अप.क्र.

१५८/२०१९ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारणा-२०१८) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) व (४) सदर कर्मचारी हे कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर Finance Management Group (FMC) लेखापाल (कंत्राटी) या पदावर कार्यरत असल्यामुळे त्यांना खात्यातून कमी करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर सुरू आहे.

---

## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील स्व.मीनाताई ठाकरे सांस्कृतिक सभागृहाच्या दुरुस्तीबाबत

**(१९) १३७८२९ (११-०७-२०१९). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील स्व.मीनाताई ठाकरे सांस्कृतिक सभागृहाची माहे जानेवारी, २०१८ पासून सुरु केलेली दुरुस्ती अद्याप झालेली नसून सभागृह बंद अवस्थेत असल्याने नागरिकांनी मा.आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांना निवेदन देऊन कार्यवाहीची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्व.मीनाताई ठाकरे सांस्कृतिक सभागृह दुरुस्तीकरिता निधीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व स्थानिक नगरसेवक यांनी मा. मुख्यमंत्री व नगरविकास विभागाकडे माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सांस्कृतिक सभागृहाची वर्षभर दुरुस्ती न करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी स्थानिक नगरसेवक व नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागरिकांच्या मागणीनुसार ठेकेदारावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१९) :** (१) स्व.मीनाताई ठाकरे सांस्कृतिक सभागृहाची माहे जानेवारी, २०१८ पासून दुरुस्ती सुरु करण्यात आलेली नाही. सदर सभागृहाच्या दुरुस्तीची मागणी लोकप्रतिनिधी, स्थानिक नगरसेवक व नागरिकांनी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेकडे केली आहे.

तथापि, स्व.मीनाताई ठाकरे सांस्कृतिक सभागृहाच्या किरकोळ देखभाल दुरुस्ती करीता सन २०१५-१६ या वर्षामध्ये रु.८.८८ लक्ष व सन २०१७-१८ मध्ये रु.७.१८ लक्ष एवढा खर्च केला असल्याचे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) होय.

स्व.मीनाताई ठाकरे रंगायतनाचे नुतनीकरण व अन्य विकासकामांकरीता निधी उपलब्ध करून देण्याची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे.

तथापि, स्व.मीनाताई ठाकरे सांस्कृतिक सभागृह दुरुस्ती करण्याचे काम अद्याप कोणत्याही ठेकेदाराकडे देण्यात आलेले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आखाडा बाळापूर (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील पोलीस स्टेशनमध्ये पुरेसा कर्मचारीवर्ग नसल्याबाबत**

**(२०) १३८३०५ (१३-०७-२०१९). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आखाडा बाळापूर (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील पोलीस ठाण्यांतर्गत ८४ गावे येत असून या गावांची सुरक्षा केवळ ४१ पोलीसांवरच असल्यामुळे या गावांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीसांची संख्या वाढविण्याबाबत तसेच पोलीस ठाण्याच्या नवीन इमारतीचा प्रलंबित असलेल्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०९-२०१९) :** (१) व (२) पोलीस स्टेशन आखाडा बाळापूर, ता.कळमनुरी, जि.हिंगोली करिता सद्यस्थितीत ४९ पोलीस कर्मचारी कार्यरत आहेत. सुधारित मापदंडानुसार पोलीस स्टेशन आखाडा बाळापूर करिता ७३ पोलीस कर्मचारी प्रस्तावित करण्यात आले असून सुधारित मापदंडानुसार आकृतीबंध अंतिम करण्याची कार्यवाही पोलीस महासंचालक कार्यालय स्तरावर सुरू आहे.

औरंगाबाद-नांदेड परिक्षेत्रासाठी ५१ पोलीस स्टेशन बांधकामाच्या प्रस्तावामध्ये पोलीस स्टेशन आखाडा बाळापूर करिता नवीन प्रशासकीय इमारत बांधण्याचा प्रस्ताव समाविष्ट असून सदर कामे हाती घेण्याबाबत निधी उपलब्धतेनुसार प्राधान्यक्रम ठरविण्याबाबत पोलीस गृहनिर्माण कल्याण महामंडळाने पोलीस महासंचालक कार्यालयास कळविले असून याबाबतची कार्यवाही पोलीस महासंचालक कार्यालय स्तरावर सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यात महिलांच्या सुरक्षिततेच्या उपाययोजना करण्याबाबत**

**(२१) १३८४८२ (१३-०७-२०१९). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात मागील तीन महिन्यांत ६८ महिलांचे विनयभंग झाले असून या आकडेवारीनुसार जिल्ह्यात एक दिवसाआड एका महिलेचा विनयभंग होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला जिल्ह्यात महिलांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष होत असल्याने विनयभंगाचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महिलांच्या सुरक्षेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१०-२०१९) :** (१) जानेवारी २०१९ ते मार्च २०१९ पर्यंत एकूण ६८ तक्रारी प्राप्त झाल्यानंतर गुन्ह्यांची नोंद केली आहे.

(२) व (३) अकोला जिल्ह्यात महिलांविरूध्दच्या गुन्ह्याचे प्रचलित कायद्यानुसार तसेच महिलांवरील होणा-या अत्याचारांवर अंकुश प्रस्थापित करण्यासाठी आणि त्यांना न्याय मिळवुन देण्यासाठी आधुनिक प्रसार माध्यमातून जनजागृती झाल्याने महिला तक्रार करण्यास समोर येत आहेत. या कारणामुळे अकोला जिल्ह्यात विनयभंगाचे गुन्ह्यात वाढ झाली आहे.

जिल्हयातील महिलांवर होणा-या अत्याचाराला आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना खालीलप्रमाणे आहे :-

• महिलांच्या सुरक्षेकरीता “दामिनी पथक” असून त्यांचे माध्यमातून महिला छेडछाड व महिलाविरूध्द गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यात येतो. दामिनी पथकाद्वारे शहरातील शाळा, महाविद्यालयांना भेटी देवून विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात येते. शैक्षणिक संस्थांमध्ये स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. तसेच लैंगिक शोषणाबाबतची माहिती देवून जनजागृती करण्यांत आली आहे.

• महिलांसाठी १०९१ ही हेल्पलाईन स्वतंत्रपणे सुरू करण्यात येवून त्याठिकाणी कर्मचारी नियुक्त करण्यांत आलेले आहेत.

• कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ मधील तरतूदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

• शाळा, कॅालेजमधील मुलींचा विनयभंग, छेडछाड व शारीरीक अत्याचार संदर्भातील घटनांना प्रतिबंध करण्यासाठी ऑल वुमन मोबाईल पेट्रोलिंग सुरू करण्यांत आली आहे. मुलींच्या छेडछाडी संबंधाने शैक्षणिक संस्थेत सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहे. बसस्थानक महिला मदत केंद्र स्थापन करण्यांत आले असून तेथे तक्रार पेटी लावण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**किणी टोलनाक्यावर (जि.कोल्हापूर) कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह निवडणूक अधिका-यांना धक्काबुक्की करण्याचे प्रकार घडल्याबाबत**

**(२२) १३८४८४ (१३-०७-२०१९). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अमन मित्तल यांच्यासह निवडणूक अधिका-यांना किणी टोलनाक्यावर थांबवून ठेवून व अधिका-यांना दमबाजी करून धक्काबुक्की करण्याचा प्रकार घडल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील किणी टोल नाक्यावर नेहमीच लोकप्रतिनिधी व शासकीय अधिका-यांना येथील कर्मचारी अडवत असल्याप्रकरणी या ठेकेदारांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी तसेच टोल नाक्यावरील वाढत चाललेल्या गुंडगिरीबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१९) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे. सदरची घटना दिनांक ०८.०४.२०१९ रोजी घडलेली असून सदर प्रकरणी उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी वडगांव पोलीस ठाणेस दिलेल्या फिर्यादीवरुन गु.र.नं.२००/२०१९ भा.दं.वि.स.क. ३५३, ३४१, ३२३, ५०४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. परंतू सदर प्रकरणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत कोणतीही तक्रार दिलेली नाही. सदर गुन्ह्यामध्ये एका आरोपीस अटक करण्यात आलेली आहे. तसेच घटनेच्या अनुषंगाने ०४ साक्षिदार तपासण्यात आले आहेत. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर येथील पोलीस आयुक्तालयासाठी निधीची तरतुद करण्याबाबत

**(२३) १३८४९५ (११-०७-२०१९). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील कायदा व सुव्यवस्था नियंत्रीत करण्यासाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली असल्याची माहिती माहे मे, २०१९ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर येथे पोलीस आयुक्तालय होण्याकरिता विशेष पोलीस महानिरिक्षक यांनी सुधारित प्रस्ताव शासनाच्या गृह विभागाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पोलीस आयुक्तालय होण्यासाठीची प्रशासकीय पातळीवरील सर्व प्रक्रिया पूर्ण झाली असून याकरिता साधारण १०० कोटी रुपयांचा निधी अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या आयुक्तालयाची निर्मिती किती कालावधीत होण्याचे शासनास अपेक्षित आहे,

(५) असल्यास, सदरील पोलीस आयुक्तालयाकरीता आवश्यक असलेल्या निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१९) :** (१), (२), (३) व (४) कोल्हापूर शहरासाठी स्वतंत्र पोलीस आयुक्तालय निर्माण करण्याचा पोलीस महासंचालक कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर केला असता वित्त विभागाने विविध मुद्दे/त्रुटी उपस्थित केल्या आहेत.

याअनुषंगाने कोल्हापूर पोलीस आयुक्त कार्यालय निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव फेरसादर करण्याबाबत पोलीस महासंचालक कार्यालयास कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी निजामपूर शहर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांबाबत**

**(२४) १३८९७६ (१३-०७-२०१९). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेचा फायदा घेऊन भिवंडी निजामपूर शहर (जि.ठाणे) महानगरपालिका क्षेत्रात ८५० अनधिकृत बांधकामे झाल्याची बाब दिनांक ५ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणात विकासक आणि अधिकारी यांनी संगनमताने मा.न्यायालयाचे आदेश डावलून अन्य ३५० बांधकामांना अभय दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित विकासक आणि अधिका-यांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१९) :** (१), (२) व (३) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहिता काळातील अनधिकृत बांधकामांची वस्तुस्थिती खालील प्रमाणे कळविली आहे:-

• सदर कालावधीत ३० अनधिकृत बांधकाम झाल्याचे निदर्शनास आले आहे.

• सदर अनधिकृत बांधकामांपैकी १ बांधकाम निष्कासित करण्यात आले असून उर्वरित २९ अनधिकृत बांधकामांमध्ये मा.उच्च न्यायालयाने स्थगिती आदेश दिले आहेत.

• तथापि, सर्व अनधिकृत बांधकामांविरुध्द महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम (MRTP) अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले असल्याचे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकण व पश्चिम महाराष्ट्राला जोडणा-या घाटातील पोलीस चेक पोस्टच्या अधिका-यांनी दारुची वाहतूक करणारी रुग्णवाहिका पकडल्याबाबत

**(२५) १३९००१ (१३-०७-२०१९). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण व पश्चिम महाराष्ट्राला जोडणा-या घाटातील पोलीस चेक पोस्टच्या अधिका-यांनी दारुची वाहतूक करणारी रुग्णवाहिका दिनांक १५ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास पकडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार किती आरोपींना अटक केली आहे, त्यांचेकडून किती रक्कमेची दारु जप्त करण्यात आली आहे व अटक केलेल्यांविरुध्द पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१९) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

कोकण व पश्चिम महाराष्ट्राला जोडणाऱ्या कुंभार्ली घाटातील कुंभार्ली चेक पोस्ट वर दिनांक १४/०३/२०१९ रोजी २०.१५ वा. रुग्णवाहीका क्र.एमएच ४३-५१३० ला पोलीसांनी थांबवून चेक केले असता चालक व आणखी एक व्यक्तीजवळ गावठी हातभट्टीची दारु मिळून आली.

सदर प्रकरणी दोन व्यक्तींविरुध्द अलोरे शिरगाव पोलीस ठाणे गु.रजि.नं.१९/२०१९, गु.प्रो.का.क्र.६५/१९२, १४६/१९६ प्रमाणे दि.१५/०३/२०१९ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्या ताब्यातील २२,०००/ रुपये किंमतीची गावठी दारु जप्त करुन किरकोळ सामनासह रुग्णवाहीका जप्त करण्यात आली.

गुन्ह्याच्या तपासात सबळ पुरावा मिळाल्याने मा.न्यायालयात दिनांक ०९/०५/२०१९ रोजी दोषारोपपत्र पाठविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर महानगरपालिकेच्या सीसीटीव्ही कॅमेरे टप्पा-२ च्या कामासाठी निधी उपलब्ध होणेबाबत

**(२६) १३९४०१ (१५-०७-२०१९). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर महानगरपालिकेकडून सीसीटीव्ही कॅमेरे चा टप्पा-२ चे काम करण्यासाठी रुपये १६.६१ कोटी इतक्या निधीचा सादर केलेला मागणी प्रस्ताव गेले कित्येक दिवस प्रलंबित असल्याची बाब माहे मे, २०१९ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा निधी देणेबाबत शासन सकारात्मक आहे काय,

(३) असल्यास, सदरचा निधी हा कधीपर्यंत वितरीत केला जाईल व निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१९) :** (१) कोल्हापूर सुरक्षित शहर प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत अंदाजे रु.१२ कोटी इतक्या निधीचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.
(२) व (३) सदरचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चेंबूर (मुंबई) येथील पंचशील नगरातील उपोषणकर्त्यांच्या मांगण्याबाबत**

**(२७) १३९६९१ (१३-०७-२०१९). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबूर (मुंबई) येथील पंचशील नगर मधील रहिवाशांनी हक्काचे घर, बौध्दविहार व इतर मुलभूत मागण्यांकरिता व विकासकाच्या मनमानी कारभाराविरोधात महिलांनी ११४ दिवसांपासून केलेले साखळी उपोषण सुरु असतांना दिनांक २१ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास उपोषणकर्त्या आंदोलकाचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या झालेल्या निधनास विकासकच जबाबदार असून विकासक मे.अरिहंत रिअल्टर्स व मे.आशापुरा डेव्हलपर्स यांच्यावर अनुसूचित जाती-जमाती प्रतिबंधक कायदा व सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी टिळकनगर पोलीस ठाण्यात उपोषणकर्त्या महिलांनी निवेदनाव्दारे तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सनदेशीर मार्गाने आंदोलन करणाऱ्या आंदोलकाकडे दुर्लक्ष करणाऱ्या एसआरए च्या अधिकारी व विकासकांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) तसेच, उपोषणकर्त्या आंदोलकांच्या मागण्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे व आंदोलकांच्या मागण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१९) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) व (३) होय, हे खरे आहे. परंतू सदर प्रकरणी उपोषणकर्ती आंदोलकांचा मृत्यू झाला नसून, आंदोलनकर्ती महिलेचा पती हा गेली पंधरा दिवस क्षयरोग, कावीळ व इतर असाध्य रोगाने आजारी होते. सदर आजार बळावल्याने त्याचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) चेंबूर (मुंबई) येथील पंचशील नगर मधील झोपडपट्टीचा पुनर्वसन प्रकल्प योग्य रितीने पुर्ण करणे, बुध्द विहार स्वतंत्र जागेवर बांधण्यात यावीत. सर्व पात्र सदनिकाधारकांना रु.५० हजार अतिरिक्त कॉपर्स फंड देण्यात यावा, अर्धवट झालेले बांधकाम पूर्ण करुन उर्वरित झोपडपट्टीधारकांना सदनिका उपलब्ध करुन द्याव्यात अशा मागण्या होत्या. सदर मागणीच्या अनुषंगाने मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण), विकासक, झोपडपट्टी पुनर्वसन अधिकारी तसेच सहकारी गृहनिर्माण संस्थांचे पदाधिकारी यांचेसमवेत यथोचित निर्णय घेण्यासाठी बैठक आयोजित केली. सदर बैठकीमध्ये जागेचे आरेखन करुन सर्व संमतीने योग्य तो निर्णय घेण्यात येईल असे निर्देश देण्यात आले.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर (जि.सोलापूर) येथील बस स्थानकामधील परिसराचे कॉंक्रिटीकरण करण्याबाबत**

**(२८) १४००७३ (०८-०७-२०१९). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील चंद्रभागा मैदान याठिकाणी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून भव्य स्वरूपाचे बस स्थानक निर्माण करण्यात येणार असल्याची बाब दिनांक १ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या पंढरपूर शहरामध्ये मध्यवर्ती बस स्थानकामध्ये खड्डे पडल्यामुळे सर्वत्र धुळीचे साम्राज्य पसरले आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पंढरपूर बस स्थानकामध्ये संपूर्ण परिसराचे कॉंक्रिटीकरण करण्याबाबत प्रशसनाकडून सूचित केले असून देखिल परिसराचे कॉंक्रिटीकरण न करण्याचे कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. दिवाकर रावते (२४-०९-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) पंढरपूर बसस्थानकाची व वाहनतळाची स्वच्छता आगाराच्या देखरेखीखाली मे.ब्रिस्क इंडिया कंपनी लि.पुणे यांचेकडून दररोज करुन घेण्यात येत आहे. तसेच, बसस्थानकावरील खड्डे खडी, ग्रीट व मुरुमाने भरुन घेण्यात आले आहेत.

तसेच, राज्य परिवहन महामंडळाद्वारे दि.२०.०६.२०१९ च्या पत्रान्वये पंढरपूर बसस्थानकाच्या कॉंक्रीटीकरणाच्या कामाचा कार्यादेश देण्यात आलेला असून, सद्यस्थितीत कॉंक्रीटीकरणाचे काम सुरु आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वैभववाडी (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) येथील बस स्थानकाच्या आवारातील जागेत डांबरीकरण करण्याबाबत**

**(२९) १४०२९१ (०९-०७-२०१९). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैभववाडी (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) येथे सुसज्ज एस.टी. बस स्थानक व्हावे याकरीता तेथील प्रवाशांनी केलेली मागणी विचारात घेऊन राज्य परिवहन महामंडळाने वैभववाडी येथे नवीन बस स्थानकाचे काम हाती घेवून माहे जानेवारी, २०१९ अखेर पर्यंत सदर बस स्थानकाचे काम पूर्ण केलेले असून नवीन बस स्थानक कार्यान्वित झालेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बस स्थानकाच्या आवारात डांबरीकरण करण्यात आलेले नसून पावसाळ्यापुर्वी डांबरीकरण करण्यात यावे अशी मागणी नावळे गावचे माजी तंटामुक्ती अध्यक्ष श्री.लक्ष्मण कदम यांनी लेखी निवेदनाद्वारे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान मा.परिवहन मंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२४-०९-२०१९) :** (१) वैभववाडी येथे बसस्थानकाच्या प्रयोजनार्थ सर्व्हे क्र.३६ अ मधील १२८५ चौ.मी. क्षेत्राची शासकीय जागा दि.२०.०७.२०१७ रोजी राज्य परिवहन महामंडळाच्या ताब्यात मिळाली असून, सदर जागेत कोणत्याही स्वरुपाचे नवीन बसस्थानकाचे बांधकाम करण्यात आलेले नाही. तथापि, सदर जागेमध्ये पुर्वीपासून अस्तित्वात असलेल्या अल्पबचत भवनाच्या इमारतीच्या अंशत: भागात किमान आवश्यक सुविधा निर्माण करुन तेथून तात्पुरत्या स्वरुपात बसस्थानकाचे कामकाज दि.२५.०१.२०१९ पासून सुरु करण्यात आलेले आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

बसस्थानकाच्या उपलब्ध मोकळ्या जागेत डांबरीकरणाचे काम करुन घेण्यापुर्वी आवाराचे खडीकरण करुन घेणे आवश्यक असल्याने त्यानुसार आवाराचे खडीकरण, तसेच आवारातून मुख्य रस्त्यावर येण्याकरीता सिमेंट पाईपचे कल्वर्ट बांधण्याच्या रु.१०,०५,३१६/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास राज्य परिवहन महामंडळाद्वारे प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर (जि.सोलापूर) शहरातील सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बंद असल्याबाबत**

**(३०) १४०३२९ (१३-०७-२०१९). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) शहरामध्ये गुन्हेगारी घडू नये व तात्काळ चोरांना पकडण्यात पोलीसांना मदत व्हावी यासाठी शहरातील प्रतिष्ठीत नागरिकांनी स्थानिक पोलीस प्रशासनाला १७ सी.सी.टी.व्ही. कॅमेरे प्रदान केले असल्याचे दिनांक ८ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त १७ सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांपैकी १६ सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बंद असल्यामुळे शहरातील गुन्ह्यांचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढले असून नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला आहे, त्यामुळे उपरोक्त सी.सी.टी.व्ही. कॅमेरे व इतर यंत्रणा सुरळीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच उपरोक्त सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बंद असण्याची कारणे काय आहेत व ती सुरू न करणाऱ्या पोलीस प्रशासनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०९-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) बंद सी.सी.टी.व्ही. कॅमेरे सुरु करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच नव्याने १४४ सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### यवतमाळ जिल्ह्यात बनावट दस्तऐवजच्या आधारे भुखंडाची विक्री केल्याबाबत

**(३१) १४०३८७ (११-०७-२०१९). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात बनावट दस्तऐवजच्या आधारे भुखंडाची विक्री केल्या प्रकरणी यवतमाळच्या मा.न्यायालयाने फिर्यादीच्या याचिकेवरून या प्रकरणात १५ जणांवर फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्याचे आदेश पोलीसांना दिल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.न्यायालयाच्या या आदेशानुसार गुन्हे दाखल करून दोषींना अटक करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी मा.न्यायालयाने दिनांक १४/०५/२०१९ रोजी दिलेल्या आदेशावरुन क.१५६(३) सिआरपीसी अन्वये पो.स्टे.अवधूतवाडी, जि.यवतमाळ येथे १७ व्यक्तींविरुध्द दिनांक १६/०५/२०१९ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

(२) व (३) आरोपींनी दाखल केलेल्या याचिकेच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात आलेली नाही.

गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर (जि.सोलापूर) येथील पोलीस निरीक्षक यांनी एका वृध्द महिलेस केलेली मारहाण**

**(३२) १४०५८८ (१५-०७-२०१९). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) शहरातील श्री.विठ्ठल मंदिर येथील सुरक्षेसाठी असणारे पोलीस निरीक्षक श्री. साळोखे यांनी वृध्द महिलेला मारहाण केल्याच्या विरोधात व त्यांच्या बेजबाबदार कार्यपध्दतीमुळे त्यांना बडतर्फ करावयाच्या मागणीसाठी मंगळवेढा येथील नगराध्यक्षा व मंगळवेढा तालुक्यातील विविध पदाधिकाऱ्यांनी दिनांक १५ मार्च, २०१९ रोजी वा त्या सुमारास मा.जिल्हा पोलीस प्रमुख (ग्रामीण) सोलापूर यांना निवेदन दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त तक्रार प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळुन आले व तद्नुसार शासनाने पोलिस निरीक्षक श्री.साळोखे यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०९-२०१९) :** (१) होय हे खरे आहे.

(२) घटनेतील वयोवृध्द महिलेने तिला झालेल्या मारहाणीबाबत प्रथमत: पोलीस ठाणेस तक्रार केलेली नाही. अथवा शासनमान्य दवाखान्यामध्ये औषधोपचारही घेतलेला नाही. सदर वयोवृध्द महिलेने साक्षीदार श्रीमती सुनिता नाना कासार (डावरी) यांना गर्दीमध्ये हाताला जोरात धक्का लागल्याने हात दुखत आहे, असे कारण सांगून तिचेकडून औषधगोळया घेतल्या आहेत. तसेच सदर जखमी महिलेची दि.२१/०३/२०१९ रोजी वैदयकीय अधिकारी, कॉटेज हॉस्पीटल, पंढरपूर यांचेकडून वैदयकीय तपासणी करून घेण्यात आलेली आहे. वैदयकीय अधिकारी यांनीही सदर महिलेचे हातावर मारहाणीच्या जखमा दिसुन येत नसल्याबाबत अहवाल दिलेला आहे. एकंदर चौकशीत पोलीस निरीक्षक श्री.साळोखे, नेमणुक श्री.विठठल रक्मिणी मंदिर सुरक्षा पंढरपूर अथवा पोलीस गणवेशाप्रमाणे गणवेशधारी असलेल्या इसमाने मारहाण केलेचे निष्पन्न झालेले नाही. त्यामुळे पोलीस निरीक्षक श्री.साळोखे अथवा पोलीस गणवेशाप्रमाणे गणवेशधारी असलेल्या इसमाविरूध्द कारवाई करण्यात आलेली नाही.

(३) विलंब झालेला नाही.

---

**कोल्हापूर (जि.कोल्हापूर) शहरातील कसबा करवीर मधील सर्व्हे नं.८७४-अे वार्ड मिळकतीच्या मुळ जमिन मालकास बाधित क्षेत्राचा मोबदला मिळण्याबाबत**

**(३३) १४०८२७ (१३-०७-२०१९). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर (जि.कोल्हापूर) शहरातील कसबा करवीर मधील सर्व्हे नं.८७४-अे वार्ड मिळकतीचे पहिल्या विकास योजनेतील डिपी रस्त्याचे बाधित क्षेत्र दुस-या विकास योजनेतील अस्तित्वातील रस्ता दर्शवून कोल्हापूर महानगरपालिकेने मुळ जमिन मालकास कोणताही मोबदला न देता त्याची फसवणूक केली असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुळ जमिन मालकाने बाधित क्षेत्राचा मोबदला मिळण्याची वारंवार मागणी करूनसुध्दा कोल्हापूर महानगरपालिकेतील संबंधित विभागाच्या अधिका-यांमार्फत मोबदला देण्याबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पहिल्या विकास योजनेतील सर्व्हे नं.८७४-अे वार्ड मधील बाधित क्षेत्राचा मोबदला मुळ मालकाला तातडीने देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१०-२०१९) :** (१) अशी बाब नाही. संदर्भातील जागेवरील रेखांकन सन १९७४ मध्ये म्हणजे ४५ वर्षापूर्वी मंजूर झालेले आहे. कसबा करवीर, सर्व्हे नं. ८७४-अे वार्ड मिळकतीचे मंजूर रेखांकनानुसार विकास योजनेतील १२.०० मी. रस्त्याखालील क्षेत्राचा ताबा दि.१३/०५/१९८८ रोजीचे विनामुल्य कब्जेपट्टीने महानगरपालिकेच्या कब्जात आला असल्याचे महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(२) ते (४) रेखांकनामधील क्षेत्रावर मंजूर विकास योजनेप्रमाणे रस्त्याचे नियोजन असल्यास व असे रस्ते रेखांकनामध्ये अंतर्गत रस्ते म्हणून दर्शविलेले असल्यास त्याकरिता मोबदला अनुज्ञेय राहात नाही. नियमानुसार रेखांकनामध्ये दर्शविण्यात यावयाच्या अंतर्गत रस्त्याच्या रुंदीपेक्षा विकास योजनेमधील रस्त्याची रुंदी जास्त असल्यास फरकाच्या रुंदीच्या क्षेत्रासाठी मोबदला अनुज्ञेय राहतो. त्याप्रमाणे कोल्हापूर महानगरपालिकेने निर्णय घेणे अभिप्रेत आहे.

---

**रत्नागिरी जिल्हयामध्ये गुन्हेगारीच्या घटनांमध्ये झालेली वाढ**

**(३४) १४१११६ (११-०७-२०१९). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयामध्ये सन २०१८ मधील गुन्हेगारीचा आलेख पाहता सन २०१७ च्या तुलनेत खून, खूनाचा करण्यात आलेला प्रयत्न, महिलांवरील अत्याचार, मारामारी आणि

चोरींच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही गुन्हेगारीची वाढ पाहता दाखल गुन्ह्यांचा तपास करुन येथील गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१९) :** (१) सन २०१८ च्या अखेरपर्यंत घडलेल्या घटनांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| गुन्ह्याचा प्रकार | सन २०१७ | सन २०१८ | वाढ/घट |
|---|---|---|---|
| खून | १२ | २१ | ९ ने वाढ |
| खूनाचा प्रयत्न | ४ | १६ | १२ ने वाढ |
| बलात्कार | ४७ | ५६ | ९ ने वाढ |
| गर्दी मारामारी | ९३ | ११८ | २५ ने वाढ |
| चोरी | ४०२ | ४४२ | ४० ने वाढ |

(२) पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, दुरक्षेत्र व बीट अंमलदार यांचेकडून परिणामकारक गावभेटकरुन घेवून गावातील सर्व घडामोडीची माहिती घेतली जाते, गावातील प्रतिष्ठीतांची एकत्रीत मिटींग घेऊन वादविवाद मिटविले जातात. गावागावात पोलीस मित्र व ग्रामरक्षक दल स्थापन करण्यात आले आहे.

रात्रगस्त, चेकींगसाठी पोलीस ठाणे स्तरावर उपविभागीय पोलीस अधिकारी नेमण्यात येतात. जिल्हास्तरावर रोज दिवसा व रात्री दरोडा प्रतिबंधक पेट्रोलींग नेमण्यात येते. महिन्यातून किमान एक वेळ सर्व जिल्ह्यात ऑल आऊट ऑपरेशन राबविण्यात येते. पोलीस ठाणे हद्दीत नियमित बीट मार्शल व दामिनी स्कॉर्ड चा वापर करुन गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्याचे कामकाम करण्यात येते.

एस.टी.स्टॅन्ड, रेल्वेस्टेशन, बाजारपेठ इ. ठिकाणी क्रियाशील गुन्हेगारांवर लक्ष ठेवून प्रतिबंधक कारवाई केली जाते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चारनेर (ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद) येथिल ग्रामस्थांनी उपसरपंच यांना मारहाण केल्याबाबत**

**(३५) १४१२३४ (१५-०७-२०१९). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चारनेर (ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद) येथे भीषण पाणी टंचाई निर्माण झाल्याने पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी अनेक वेळा मागणी करुनही पाणी पुरवठा न केल्याने संतापलेल्या गावक-यांनी उपसरपंच श्री.रविसिंग राजपूत यांना दिनांक १४ मे, २०१९ रोजी वा त्या सुमारास जबर मारहाण केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जखमी उपसरपंचास औरंगाबाद येथील घाटी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) होय. सदर प्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार पोलीस ठाणे सिल्लोड ग्रामीण, जि.औरंगाबाद येथे गु.र.नं.१०३/२०१९ कलम १४३, १४७, १४८, १४९, ३२४, ५०४, ५०६ भादंवि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात पांच आरोपींना अटक करण्यात आली असून मा.न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला आहे. तसेच त्यांनी भविष्यात शांतता राखावी म्हणून त्यांच्याविरुध्द कार्यकारी दंडाधिकारी, सिल्लोड यांच्याकडे चॅप्टर केस क्र.१२७/२०१९ कलम १०७ सह.आर.पी.सी. प्रमाणे प्रतिबंधक कारवाई केली आहे. सदर आरोपितांविरुध्द सबळ पुरावे प्राप्त झाले असल्याने त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूरसह आसपासच्या ४२ गावांचा विकासाकरिता " कोल्हापूर क्षेत्र नागरी विकास प्राधिकरण" ची स्थापना केल्याबाबत

**(३६) १४१३३० (१३-०७-२०१९). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूरसह आसपासच्या ४२ गावांच्या विकासाकरिता " कोल्हापूर क्षेत्र नागरी विकास प्राधिकरण" ची स्थापना केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत आठ महिन्यांपासून मंजूरी मिळालेल्या २७ पदांपैकी चार पदे थेट नियुक्तीने भरण्याचा प्रस्तावही शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्राधिकारणांची एकही बैठक अद्यापपर्यंत घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्राधिकरणाकडे अद्यापपर्यंत शासनाने किती विकासाचे प्रस्ताव पाठविले आहेत व किती प्रस्तावांना मंजूरी दिली आहे,
(५) असल्यास, याकरिता किती रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१०-२०१९) :** (१) हे खरे आहे.

शासनाने दि. ०४/०१/२०१८ रोजीच्या अधिसूचनेन्वये कोल्हापूरसह आसपासच्या ४२ गावांच्या विकासाकरिता कोल्हापूर क्षेत्र नागरी विकास प्राधिकरणाची स्थापना केली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) निरंक, शासनाने विकासाचे प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविलेले नाहीत.

(५) कोल्हापूर नागरी क्षेत्र प्राधिकरणास त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये बांधकाम / विकास कामांसाठी तसेच सरकारी जमिनी हस्तांतरण करुन घेणे कामी व अन्य अनुषंगिक कामकाजासाठी बीज भांडवल करीता याप्रमाणे सर्व विकास कामांसाठी ११०.०० कोटी निधी अनुदान या स्वरुपात मिळावा, अशी प्राधिकरणाने दि. १६/०१/२०१९ रोजीच्या पत्राद्वारे शासनास मागणी केली आहे. या अनुषंगाने शासनस्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

(६) प्राप्त परिस्थितीत कोणताही विलंब झालेला नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयाचा प्रादेशिक विकास आराखडा प्रलंबित असल्याबाबत**

**(३७) १४१३३४ (०९-०७-२०१९). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयाचा आगामी काळात परिपूर्ण विकास करण्याकरिता प्रादेशिक विकास आराखडा अद्यापही प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रादेशिक विकास आराखडा प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत व याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदरहू विकास आराखडयास केव्हापर्यंत मंजूरी मिळण्याचे शासनास अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१०-२०१९) :** (१) हे खरे नाही.

शासनाने कोल्हापूर जिल्हयाची सुधारित प्रादेशिक योजना दि. ०४/०१/२०१८ रोजीच्या अधिसूचनेन्वये मंजूर केली आहे. सदर प्रादेशिक योजना दि. ०१/०४/२०१८ पासुन अंमलात आली आहे.

(२) सदर प्रादेशिक योजना मंजूर झाली असल्याने या अनुषंगाने शासनाने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तथापि कोल्हापूर जिल्हयाचा प्रादेशिक आराखडा प्रसिध्द झाल्यानंतर त्यावर प्राप्त झालेल्या हरकतींवरील सुनावणी योग्य रितीने झाली नसल्याबाबतच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या होत्या. त्यासाठी शासनाने दि.०३/०४/२०१८ चा निर्णयान्वये सदर हरकत धारकांचे / तक्रारींचे निराकरण करुन, त्यांना सुनावणी देऊन मंजूर प्रादेशिक योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २० खालील फेरबदलाची कार्यवाही सुचविणेबाबत त्रिसदस्य समिती नेमली आहे. सदरच्या त्रिसदस्य समितीस २०००

हरकती / सूचना प्राप्त झाल्या आहेत. सदर शासन नियुक्त त्रिसदस्य समितीने सर्व हरकत धारकांना सुनावणी दिली आहे. सदर हरकती / सुनावणी वरील त्रिसदस्य समितीचा अहवाल अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही.
(३) सदर त्रिसदस्य समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर, मंजूर प्रादेशिक आराखड्यातील प्राप्त हरकती सूचनेच्या अनुषंगाने शासनाकडून अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

---

**नांदेड शहरात बेकायदा होर्डींग,मोबाईल टॉवर तसेच केबल टाकणा-यांवर कारवाई करण्याबाबत**

**(३८) १४१४१६ (१३-०७-२०१९). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड शहरात बेकायदा होर्डींग, मोबाईल टॉवर तसेच केबल टाकल्यामुळे धोकादायक झालेल्या रस्त्यांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नांदेड शहरातील बेकायदा होर्डींग, मोबाईल टॉवर व केबल टाकल्यामुळे धोकादायक झालेल्या रस्त्यांचे स्ट्रक्चर ऑडीट करुन दोषी असणा-यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१९) :** (१) व (२) • नांदेड शहरातील सर्व जाहीरात एजन्सीधारकांना स्ट्रक्चरल ऑडीट करुन, अहवाल सादर करण्याबाबत महानगरपालिकेने त्यांच्या दिनांक ७.५.२०१९ च्या पत्राद्वारे सूचना दिलेल्या आहेत.
• त्याचप्रमाणे मोबाईल टॉवर केबल टाकण्यासाठी परवानगी देताना संबंधित कंपनीकडून नियमानुसार रस्ता दुरुस्ती चार्जेस व प्रशासकीय शुल्काचा भरणा करुन घेण्यात येतो व तद्नंतर महानगरपालिकेमार्फत सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्यात येते, असे नांदेड वाघाळा शहर महानगरपलिका यांनी कळविलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बाळापूर (जि.अकोला) पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शालेय शिक्षकाने विद्यार्थ्यासोबत अनैसर्गिक कृत्य केल्याबाबत**

**(३९) १४१४८२ (१५-०७-२०१९). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाळापूर (जि.अकोला) पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शालेय शिक्षकाने सातवर्षीय विद्यार्थ्यासोबत अनैसर्गिक कृत्य केल्याबाबतची घटना माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सदर विद्यार्थ्याच्या पाल्याने बाळापूर पोलीस ठाण्यात तक्रार करुनही शिक्षक श्री.प्रविण भास्कर खंडारे व शाळेवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्या अनुषंगाने संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०९-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

सदरची घटना दि. ०२/१०/२०१४ ते ०८/१०/२०१४ या कालावधीत घडलेली आहे.
(२) व (३) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून बाळापुर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २००/१४ कलम ३७७ भादंवि सह कलम ३, ४, ५, ६ लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ (पोक्सो) अन्वये आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला असून नमूद गुन्ह्यातील आरोपीस अटक करण्यात आली. आरोपीविरूध्द मा. न्यायालयात दोषसिध्द झाल्याने आरोपी यास कलम ३७७ भादंवि सह कलम ४ लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ अन्वये १० वर्ष सक्त मजुरी व रू. ५०००/- दंडाची शिक्षा सुनावली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वसई पूर्व-पश्चिमेला जोडणाऱ्या अंबाडी पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(४०) १४१८०२ (१३-०७-२०१९). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई पूर्व-पश्चिमेला जोडणाऱ्या ३८ वर्ष जुन्या अंबाडी पुलाची दुरुस्ती अत्यंत धीम्यागतीने सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पुलाची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, सदर पुल शहराला जोडणारा मुख्य उड्डाणपूल असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ व वाहतुक कोंडीची समस्या निर्माण होत असल्याने शासन स्तरावर कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, जुन्या उड्डाणपुलाची दुरुस्ती किती दिवसात पूर्ण करण्यात येईल व त्याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१९) :** (१), (२) व (३) वसई पूर्व-पश्चिम जोडणाऱ्या अंबाडी पूलाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे :-
• अंबाडी रोड येथे जुन्या रेल्वे ओव्हर पुलाची दुरुस्ती पश्चिम रेल्वे मार्फत सुरु आहे.
• तसेच जुन्या पूलालगत एमएमआरडीने नविन पूल बांधला असून त्याचा वापर रहदारीसाठी सुरु आहे. तसेच जुन्या पूलाचा लवकर वापर होऊन रहदारीची कोंडी दूर होऊ शकेल.

• वाहतुक कोंडीची समस्या असलेल्या ठिकाणी वाहतूक नियमनाच्या उपाययोजना वाहतुक विभागामार्फत करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील अशासकिय अनुदानित उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम शिक्षकांना आणि अन्य कर्मचाऱ्यांना सातवे वेतन आयोग लागु करण्याबाबत**

**(४१) १४१८६७ (१५-०७-२०१९). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यातील कौशल्य विकास व उद्योजकता विभागा अंतर्गत चालविल्या जाणाऱ्या महाराष्ट्रातील अशासकिय अनुदानित उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम शिक्षकांना आणि अन्य कर्मचाऱ्यांना दिनांक १ मे, २०१९ अखेरपर्यंत सातवे वेतन आयोग लागु करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयाला माहे एप्रिल, २०१९ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान याबाबत निवेदन देवुन अवगत करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, राज्यातील अशासकीय अनुदानित संस्थातील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमांना शिकविणाऱ्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात यावे अशी मागणी करणारे लेखी निवेदन महाराष्ट्र व्होकेशनल टिचर्स असोसिएशन यांनी माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान शासनासह लोकप्रतिनिधीना दिले आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, काही अशासकिय अनुदानित उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाचे शिक्षक आणि अन्य कर्मचारी नुकतेच सेवानिवृत्त झाले असुन त्यांची सेवानिवृत्ती प्रकरणेही यामुळे रखडली आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू कर्मचाऱ्यांना सातवे वेतन आयोग लागु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०४-१०-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) नाही.
(५) अशासकीय अनुदानित तंत्र माध्यमिक शाळा, तसेच उच्च माध्यमिक विद्‌यालयातील व्यवसाय अभ्यासक्रमातील (+२ स्तरावरील व्दिलक्षी व उच्च माध्यिमिक व्यवसाय) शिक्षक व

शिक्षकेतर कर्मचा-यांना ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यासाठी कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचा शासन निर्णय क्रमांक: व्हिओसी-२०१८ /प्र.क्र.१२२ /व्यशि-४, दि.१८ जून २०१९ लागू केलेला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला शहरातील एका महिलेवर झालेला अत्याचार**

**(४२) १४२०३७ (१५-०७-२०१९). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवता ते मलकापूर रोडवरील एका कोरड्या खदानीत अकोला शहरातील एका ४५ वर्षीय महिलेवर पाच युवकांनी दिनांक १ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास लैंगिक अत्याचार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकोला एमआयडीसी पोलीसांनी महिलेला उपचारासाठी सर्वोपचार रुग्णालयात दाखल केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०९-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) फिर्यादी महिलेस तिच्या सोबत राहणारा इसम व शेजारी राहणारी महिला यांनी परस्पर सर्वोपचार रुग्णालय, अकोला येथे भरती केले आहे

फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी., अकोला येथे गु.र.नं. ८५/१९ कलम ३७६ (ड) भा.दं.वि. अन्वये ०५ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्हयातील पाचही आरोपीतांना अटक करण्यात आली असून सध्या नमूद गुन्हयातील आरोपी क्र. १ ते ५ हे न्यायालयीन कोठडीत आहेत. दाखल गुन्हयातील आरोपीतांविरूध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले असून सद्यस्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला येथे शिक्षकांच्या वेतन निश्चितीच्या देयकासाठी पैशाची मागणी केल्याच्या तक्रारीबाबत**

**(४३) १४२०४९ (१५-०७-२०१९). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला येथे सातव्या वेतन आयोगानुसार शिक्षकांच्या वेतन निश्चितीच्या देयकासाठी पैशाची मागणी केल्याप्रकरणाची तक्रार अकोला (जि.अकोला) पंचायत समितीने लाचलुचपत

प्रतिबंधक विभागाकडे (एसीबी) केल्याची घटना माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणाची चौकशी पूर्ण झाली आहे काय, असल्यास चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने या प्रकरणी दोषी असणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१९) :** (१), (२) व (३) होय.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने या प्रकरणी जिल्हा परिषद, अमरावती यांच्याकडून सविस्तर अहवाल मागविला असून सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**अकोला शहरातील (जि.अकोला) सहायक कामगार आयुक्त कार्यालयातील विविध समस्यांबाबत**

**(४४) १४२०६६ (१५-०७-२०१९). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला शहरास (जि.अकोला) सहायक कामगार आयुक्त न मिळाल्याने अनेक बांधकाम मजुरांना कामगार आयुक्त कार्यालयात वारंवार जावे लागणे इत्यादि विविध समस्यांबाबतची निवेदने बांधकाम मजुर संघटनेने मा.कामगारमंत्री, राज्य मंत्री, पालक मंत्री यांना वारंवार देऊन देखील कार्यवाही होत नसल्याने बांधकाम मजुरांनी या कार्यालयास कुलुप लावण्याचा इशारा दिला असल्याची बाब माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागण्यांच्या पुर्ततेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. संजय कुटे (२७-०९-२०१९) :** (१) होय अंशत: खरे आहे.

बिल्डींग पेन्टर्स बांधकाम मजूर असोसिएशन यांनी दि.२०.५.२०१९ रोजी कामगार आयुक्त, मुंबई यांना निवेदन अग्रेषित केले असून सदर निवेदनाची प्रत मा.कामगारमंत्री, मा.पालक मंत्री, अकोला, जिल्हाधिकारी अकोला, अपर कामगार आयुक्त, सहायक कामगार आयुक्त, अकोला यांना पृष्ठांकित केले आहे.

सदर निवेदनात त्यांनी सहायक कामगार आयुक्त, अकोला येथे पूर्णवेळ उपस्थित नसल्यामुळे बांधकाम कामगारांची अनेक कामे प्रलंबित राहतात. त्याकरिता अकोला येथे पूर्णवेळ सहायक कामगार आयुक्त उपलब्ध करून देण्याची विनंती केलेली आहे.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन आदेश दि.१७/१२/२०१८ नूसार अकोला येथे पूर्णवेळ सहायक कामगार आयुक्त यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(२) सहायक कामगार आयुक्त, अकोला कार्यालयामध्ये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुंबई अंतर्गत अकोला जिल्ह्यामध्ये सन २०११ पासून बांधकाम कामगारांची नोंदणी व नुतनीकरण तसेच विविध कल्याणकारी योजनांचे कामे सुरू असून माहे मे, २०१९ अखेर १९,८४६ कामगारांची नोंदणी करण्यात आलेली आहे. मंडळाद्वारे एकुण ७४२२ विविध कल्याणकारी योजनांच्या अर्जावर लाभार्थी कामगारांना एकुण रू.४,३१,११,०००/- एवढा लाभ वाटप करण्यात आलेला आहे. सहायक कामगार आयुक्त, अकोला या पदावर पूर्णवेळ अधिका-याची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सरकारी कामगार अधिकारी १, दुकाने निरीक्षक १, लिपिक टंकलेखक ३ व महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून ३ कर्मचारी कंत्राटी पद्धतीवर अकोला कार्यालयात नियुक्त केलेले असल्याने बांधकाम कामगारासंबधी नोंदणी व लाभ वाटपाबाबतची कामे सहायक कामगार आयुक्त, अकोला कार्यालयात सुरळीतपणे सुरू आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गवळीपुरा (ता.कारंजा, जि.वाशिम) येथिल एका व्यक्तीच्या शेत जमिनीमधून विनापरवानगी काळी माती व मुरुम खोदून नेल्याबाबत**

**(४५) १४२३७८ (११-०७-२०१९). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गवळीपुरा (ता.कारंजा, जि.वाशिम) येथिल श्री.बद्रोदिन रहेमान पटेल यांच्या मौजे खेडी कारंजा येथील ११ एकर शेत जमिनीमधील काळी माती व मुरुम विनापरवानगी समृध्दी महामार्गाच्या कंत्राटदाराने दिनांक १ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास खोदून नेल्याची तक्रार कारंजा शहर पोलीस स्टेशनला पटेल यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकारामुळे पटेल यांची जमीन पेरणी अयोग्य झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात त्यांनी कंत्राटदाराला विचारणा केली असता त्याने अश्लील भाषेत शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

बद्रुद्दीन रहेमान पटेल यांचा दिनांक २ मे, २०१९ रोजीचा गैर अर्जदार नारायण अग्रवाल (ठेकेदार) व इतर १० ते १५ व्यक्तींविरुध्द त्यांच्या शेत जमिनीमधील काळी माती व मुरुम विनापरवानगी खोदून नेल्याबद्दल तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे.

(२) बद्रुद्दीन रहेमान पटेल यांचे शेताची पहाणी केली असता, त्यांचे शेतात कोणत्याही प्रकारचे खोदकाम किंवा माती मुरुम काढून नेल्याचे दिसले नाही व सध्या अर्जदाराचे शेतात पेरणी केलेली असून त्यामध्ये सोयाबीनचे पिक आहे. या प्रकारचा घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आलेला आहे.
(३) व (४) चौकशीमध्ये तक्रारीचे अनुषंगाने कोणतेही तथ्य आढळून आले नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाशिम जिल्ह्यात चोरी, दरोडा व लुटमारीच्या घडलेल्या घटनांबाबत**

**(४६) १४२४३९ (१५-०७-२०१९). श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्ह्यात माहे मे, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान १० दिवसात प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे चोरी, दरोडा व लुटमारीच्या घटना घडल्याने जिल्ह्यातील नागरिक भयभीत झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.
माहे मे २०१९ मध्ये वाशिम जिल्ह्यात खालीलप्रमाणे गुन्हे दाखल झाले.

| गुन्ह्याचा प्रकार | दाखल गुन्हे | उघड गुन्हे |
|---|---|---|
| दरोडा | ३ | ३ |
| जबरी चोरी | ६ | ४ |
| घरफोडी | ९ | १ |
| चोरी | ३४ | ७ |
| एकूण गुन्हे | ५२ | १५ |

घटकातील नागरीकांच्या सुरक्षिततेसंबंधाने वाशिम पोलीसांकडून दैनंदिन स्तरावर बिटमार्शल गस्त, रात्रगस्त, जिल्हा स्तरीय दरोडा गस्त लावण्यात येते. याचबरोबर घटकामध्ये वेळोवेळी कोबिंग ऑपरेशन व नाकाबंदी राबविण्यात येत असून गुन्हेगारांविरुध्द कारवाई करण्यात येते. गुन्हेगारांविरुध्द विविध प्रकारच्या प्रतिबंधक कारवाई करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### परभणी शहरातील 'दामिनी' पथकाकडे मनुष्यबळाची कमतरता असल्याबाबत

**(४७) १४२५०५ (१५-०७-२०१९). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरातील महिलांच्या छेडछाडीच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कार्यरत असलेल्या 'दामिनी' पथकाकडे मनुष्यबळाची कमतरता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पथकात केवळ एक महिला प्रभारी अधिकारी व दोन पोलीस कर्मचा-यांवर ही अतिरिक्त जबाबदारी सोपविण्यात आल्यामुळे शहरातील साडेतीन लाखांपेक्षा जास्त असलेल्या लोकवस्तीच्या छेडछाडीच्या घटनांवर लक्ष केंद्रीत करण्यास अनेक अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातील छेडछाडीचे वाढते प्रमाण नियंत्रीत करण्यासाठी 'दामिनी' पथकातील मनुष्यबळ वाढविण्याच्या अनुषंगाने वा पर्यायी सक्षम यंत्रणा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०९-२०१९) :** (१), (२) व (३) दामिनी पथक हे महिला व मुलींच्या सुरक्षेसाठी स्थानिक पातळीवर स्थापन करण्यात आलेले आहे. सदर पथकामध्ये १ अधिकारी व ४ कर्मचारी नेमणुकीस असून त्यांना स्वतंत्र शासकीय वाहन पुरविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नगर (जि.अहमदनगर) तहसिलदार यांनी जमविलेली बेहिशेबी मालमत्ता

**(४८) १४२५२७ (१५-०७-२०१९). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर (जि.अमरावती) येथील लोकप्रतीनिधी यांनी प्रधान सचिव,गृह विभाग यांच्याकडे अप्पा शिंदे तहसीलदार, नगर (जि.अहमदनगर) यांचेवर बेहिशोबी मालमत्ता जमविले प्रकरणी गुन्हा दाखल करावा याबाबतचे निवेदन दिनांक ३ जानेवारी, २०१९ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनातील मूळ तक्रारदार श्री.गौतम विजय बोरा यांच्या तक्रार अर्जा सोबत अवैध बेहिशोबी संपत्ती जमा केल्याचे पुरावेही जोडले आहेत, हे ही खरे काय,

(३) असल्यास, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने या तक्रारीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करून अवैध संपत्ती जमा करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) सदर निवेदन पुढील चौकशीसाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र यांच्याकडे देण्यात आले असून या प्रकरणातील मूळ तक्रारदार यांनी दिलेल्या कागदपत्रांची पडताळणी सुरु आहे. मूळ तक्रारदार यांच्या तक्रारीतील पुरावे त्रोटक असल्याने याबाबत सविस्तर माहिती घेण्याचे काम गोपनीय पडताळणीमध्ये सुरु आहे.

यातील गैरअर्जदार श्री. अप्पा शिंदे, तहसिलदार, नगर यांचे मालमत्तेच्या चौकशीत त्यांची अपसंपदा निष्पन्न झाल्यास, त्यांच्याविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्याची तजवीज ठेवली आहे.

---

## दौंड (जि.पुणे) तालुक्यात भेसळयुक्त डांबर बनविणाऱ्या प्लांट वर टाकण्यात आलेला छापा

**(४९) १४२९४० (१२-०७-२०१९). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पांढरेवाडी (ता.दौंड, जि.पुणे) या ठिकाणी दिनांक १२ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास भेसळयुक्त डांबर बनविणाऱ्या प्लांटवर छापा टाकून मुद्देमाल जप्त करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१९) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

दिनांक ११ मे, २०१९ रोजी पोलीस उपनिरीक्षक यांनी इतर पोलीस कर्मचाऱ्यांसह छापा टाकून एक डांबराने भरलेला एमएच ०४-सीआर.८३४१ क्रमांकाचा ट्रक, एक एमएच १८ एए ९९८२ क्रमांकाचा रिकामा टँकर, एक टाटा कंपनीचा जनरेटर सह टेम्पो नंबर एमएच १२ क्यू ६६६५, तसेच भेसळयुक्त डांबर बनविण्यासाठी लागणारे साहित्य व कच्चामाल असा एकूण २१,९३,६००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर छाप्याच्या अनुषंगाने दौंड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.२९४/२०१९ भा.द.वि. कलम ३७९, ४२०, ३४ प्रमाणे दिनांक ११/०५/२०१९ रोजी गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणी दोन व्यक्तींना अटक करण्यात आली होती. तथापि मा.न्यायालयाने जामीन मंजूर केल्याने ते जामीनावर आहेत.

गुन्ह्यांचा तपास चालू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धारावीचा पुनर्विकास प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत**

**(५०) १४३१०२ (०८-०७-२०१९). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी शासनाने २६ हजार कोटी रुपयांच्या नव्या प्रस्तावाला मंजुरी देऊनही निधीअभावी सदर प्रकल्प प्रलंबित राहणार असल्याचे दिनांक २ मे, २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा प्रकल्प मार्गी लागावा म्हणून शासनाने ८०० कोटी रुपयांची मागणी म्हाडाकडे केली असता म्हाडा कामगार संघटनेच्या विरोधामुळे प्रकरण न्यायालयात जाऊन हा निधी अद्याप देण्यात आला नसल्याने प्रकल्प प्रलंबित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्प जलदगतीने मार्गी लावण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-०९-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) धारावी पुनर्विकास प्रकल्पातील सेक्टर १ ते ५ या सर्व सेक्टर्सचा विशेष हेतू कंपनी (Special Purpose Vechile-SPV) च्या माध्यमातून एकत्रित विकास करण्यासाठी दिनांक ०५.११.२०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. त्यानुसार निविदा प्रक्रीया धारावी पुनर्वसन प्रकल्प स्तरावर राबविण्यात येत आहे.

दिनांक २८ मे, २०१९ च्या शासन निर्णयान्वये धारावी अधिसूचित क्षेत्रालगतच्या रेल्वेची जमीन धारावी पुनर्वसन प्रकल्पाच्या एकत्रित विकासाकरीता धारावी पुनर्वसन प्रकल्पाला रेल्वेने उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने आगाऊ भरणा (upfront Amount) रक्कम रु.८००/- कोटी रक्कम प्रदान करण्यासाठी धारावी पुनर्वसन प्रकल्पाला उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

---

**विधान भवन :**

**मुंबई.**

**सचिव**

**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.